# महाराष्ट्र सर्वेक्षण अहवाल- 2018

(मतदारांचे प्राधान्य आणि महाराष्ट्रातील गव्हर्नन्सच्या प्रश्नांवर सरकारची कामगिरी यांचे थोडक्यात विश्लेषण)

## एडीआरचा अहवाल

**असोसिएशन फॉर डेमोक्रेटिक रिफॉर्म्स**

टी-95, सी. एल. हाऊस, 2रा मजला,

गुलमोहर कमर्शियल कॉम्प्लेक्स, गौतम नगर,

नवी दिल्ली-110049

दूरध्वनी: +91-011-41654200

फॅक्स: +91-11-46094248

# प्रस्तावना आणि कार्यप्रणाली

असोसिएशन फॉर डेमोक्रेटीक रिफॉर्मस् (एडीआर) आणि आरए ॲस्टराइज कम्प्युटींग अँड डेटा सोल्युशन्स प्रा. लिमिटेड (आरएएसी) यांनी केलेले हे मतदार सर्वेक्षण कदाचित एखाद्या देशातील सर्वात मोठे सर्वेक्षण असेल. हे अखिल भारतीय सर्वेक्षण 534 लोकसभा मतदारसंघात केले गेले, ज्यामध्ये विविध जनसांख्यिकी विभागातील 2,73,487 मतदारांनी भाग घेतला. या सर्वेक्षणाची 3 प्रमुख वैशिष्ट्ये खालील प्रमाणे आहेत. 1. विशिष्ट शासन समस्यांबाबत मतदारांचे प्राधान्य 2. त्या समस्यांसंबंधी सरकारच्या कामगिरीबाबत मतदारांनी दिलेले रेटींग आणि 3. मतदान वर्तणुकीवर परिणाम करणारे घटक, हे सर्वेक्षण 2019 च्या सर्वसाधारण निवडणुकांपूर्वी ऑक्टोबर 2018 ते डिसेंबर 2018 या कालावधीमध्ये केले गेले.

महाराष्ट्रावर लक्ष केंद्रित करणारा हा अहवाल महाराष्ट्रातील मतदारांनी नमूद केल्याप्रमाणे 10 सर्वांत महत्त्वाच्या प्रशासकीय समस्यांवर (प्रश्नावलीत नमूद केलेल्या ३१ पैकी) भर देतो. मतदारांचे हे प्राधान्यक्रम प्रतिसादकांच्या मते सरकारच्या त्या समस्यांवरील कामगिरीच्या संदर्भात अभ्यासण्यात आले आहेत. या सर्वेक्षणात महाराष्ट्रातील सर्व 48 संसदीय मतदारसंघामधील सुमारे 24,000 प्रतिसादकांची मते तपासण्यात आली.

या दृष्टीकोनाच्या अभ्यासाचे प्रमुख उद्दिष्ट हे सरकारकडून मतदारांच्या सर्वांत महत्त्वाच्या अपेक्षा अधिक चांगल्या पद्धतीने समजून घेणे आणि त्याच्या कामगिरीचे ते कशा पद्धतीने मूल्यमापन करतात हे पाहण्याचे आहे. याशिवाय, ते समकालीन काळातील एक महत्त्वाची दरी सांधण्याचा प्रयत्न करतात, ती म्हणजे पुराव्यांवर आधारित संशोधन आणि प्रशासनावरील कारवाई. याचे कारण म्हणजे आपण अनेक वर्षांपासून विविध तज्ञांची विचारसरणी आणि मते यांच्यावर आधारित राहिलो आहोत. अर्थात, हे महत्त्वाचे आहेच, पण आपण मतदारांच्या प्राधान्यक्रमांवरही भर देणे गरजेचे आहे. हे प्राधान्यक्रम आणि मूल्यमापन कालानुरूप बदलत जातील आणि त्यामुळे हे सर्वेक्षण काही काळाने पुन्हा करणे गरजेचे आहे.

**संशोधन रचना**: 18 वर्षे वयापेक्षा अधिक असलेल्या लोकसंख्येचे एक आंतरशाखीय, प्रातिनिधीक सर्वेक्षण असून त्यात समाजाच्या ग्रामीण-शहरी, लिंग, जात, धर्म आणि उत्पन्न वर्गातील विविध विभागांमधील प्रतिनिधित्व असेल याची खातरजमा करण्यासाठी अंशतः सहेतुक नमुना गोळा करण्याची प्रक्रिया अवलंबण्यात आली आहे. नमुने निष्पक्ष असतील आणि लोकसंख्येचे पूर्णतः प्रतिनिधित्व करतील हे पाहण्यासाठी पूर्ण काळजी घेण्यात आली आहे. सर्वेक्षणाची अचूकता 95% आहे म्हणजेच खरे गुण सर्वेक्षणाच्या अंदाजाच्या 5% मध्ये बदलू शकतात.

# प्रमुख निष्कर्ष

- महाराष्ट्र सर्वेक्षण 2018 मधून असे दिसते की रोजगाराच्या चांगल्या संधी (42.10%), पिण्याचे पाणी (37.53%)आणि कृषी कर्ज उपलब्धता (29%) हे महाराष्ट्रातील पहिल्या तीन क्रमांकांचे मतदारांचे प्राधान्यक्रम आहेत.

- मतदारांच्या सर्वोच्च तीन प्राधान्यक्रमांवर सरकारची कामगिरी रोजगाराच्या चांगल्या संधींबाबत (5 पैकी 2.48), पिण्याचे पाणी (2.52) आणि कृषी कर्ज उपलब्धता (2.35) याबाबत सरासरीपेक्षा कमी असल्याचे नोंदवले गेले.

- ग्रामीण महाराष्ट्रात मतदारांचे सर्वोच्च तीन प्राधान्यक्रम कृषी कर्ज उपलब्धता (51%), शेतीसाठी पाण्याची उपलब्धता (49%) आणि कृषी उत्पादनांना जास्त बाजारभाव (46%) हे होते.

- ग्रामीण मतदारांच्या सर्वोच्च तीन प्राधान्यक्रमांवर सरकारची कामगिरी कृषी कर्ज उपलब्धताबाबत (5 पैकी 2.35), शेतीसाठी पाण्याची उपलब्धता (2.29) आणि कृषी उत्पादनांना जास्त बाजारभाव (2.17) यांबाबत सरासरीपेक्षा कमी असल्याचे नोंदवले गेले.


- याशिवाय, सरकारने बियाणे/ खतांसाटी कृषी सवलत देण्याबाबत (2.24) आणि शेतीसाठी वीजपुरवठा (2.27) करण्याबाबत अत्यंत वाईट कामगिरी केली आहे.

- महाराष्ट्रातील शहरी मतदारांसाठी सर्वोच्च तीन प्राधान्यक्रम हे चांगल्या रोजगार संधी (48%), पिण्याचे पाणी (43%) आणि वाहतूक कोंडी (35%) हे होते.


- शहरी मतदारांच्या सर्वोच्च तीन प्राधान्यक्रमांवर सरकारची कामगिरी चांगल्या रोजगाराच्या संधींबाबत (2.27), पिण्याचे पाणी (2.32) आणि वाहतूक कोंडी (2.10) याबाबत सरासरीपेक्षा कमी असल्याचे नमूद करण्यात आले.

- याशिवाय, ध्वनी प्रदूषण (2.17) आणि चांगले रस्ते (2.32) याबाबत सरकारने अत्यंत वाईट कामगिरी केली आहे.

# I. महाराष्ट्रातील मतदारांचे सर्वोच्च 3 प्राधान्यक्रम आणि महाराष्ट्र सरकारची कामगिरी- एकूण आणि ग्रामीण व शहरी





*आलेख* 1: *महाराष्ट्र* - मतदारांचे सर्वोच्च 3 प्राधान्यक्रम आणि सरकारची कामगिरी *गुणदान*





*आलेख* 2: *महाराष्ट्र- मतदारांच्या प्राधान्यांचे ग्रामीण आणि शहरी विभाजन आणि सरकारी कामगिरी*

## II. ग्रामीण मतदारांचे प्राधान्यक्रम आणि महाराष्ट्र सरकारची कामगिरी





*आलेख 3: महाराष्ट्रातील ग्रामीण मतदारांचे प्राधान्यक्रम*





*आलेख 4: महाराष्ट्रातील ग्रामीण मतदारांच्या प्राधान्यक्रमावर सरकारची कामगिरी*

# III. शहरी मतदारांचे प्राधान्यक्रम आणि महाराष्ट्र सरकारची कामगिरी




*आलेख 5: महाराष्ट्रातील शहरी मतदारांची कामगिरी*




*आलेख 6: महाराष्ट्रातील शहरी मतदारांच्या प्राधान्यक्रमावर सरकारची कामगिरी*

# मतदारांचा स्वभाव

या सर्वेक्षणातून मतदारांच्या स्वभावाच्या खालील घटकांचे विश्लेषण करण्याचा प्रयत्न केला गेला -

– (i) मतदानाच्या स्वभावावर परिणाम करणारे घटक, (ii) गुन्हेगारी पार्श्वभूमीचे उमेदवार निवडणूक लढवत असल्याबाबत मत (iii) गुन्हेगारी आणि पैसा यांच्या भूमिकेबाबत मतदारांची जागरूकता.

मतदानाच्या स्वभावावर परिणाम करणाऱ्या घटकांचा विचार करण्यासाठी खालील प्रश्न विचारण्यात आले – "तुम्ही उमेदवारांना कोणत्या कारणासाठी मतदान करता?" आणि "एखाद्या निवडणुकीत कोणत्या उमेदवाराला मतदान करावे हे ठरवण्यासाठी कोणाचे मत सर्वांत महत्त्वाचे ठरले?".

गुन्हेगारी पार्श्वभूमीचे उमेदवार निवडणूक लढवत असल्याबाबत उमेदवारांची मते जाणून घेण्यासाठी दोन प्रश्न विचारण्यात आले-"गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेली एखादी व्यक्ती संसदेत किंवा राज्य विधानमंडळात असावी का?" आणि "गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या या लोकांसाठी लोक मतदान का करतात?".

गुन्हे आणि पैशांबाबत मतदारांमधील जागरूकता तपासण्यासाठी त्यांना काही प्रश्न विचारण्यात आले. ते म्हणजे– "रोख/ पैसे/ भेटवस्तू यांचे वितरण बेकायदेशीर असते हे तुम्हाला माहीत आहे का?", "मागील निवडणुकीत तुमच्या मतदारसंघात रोख रक्कम/ पैसे/ भेटवस्तू/ दारू यांचे वितरण झाल्याच्या घटनांची तुम्हाला माहिती आहे का?", आणि "तुम्हाला हे माहीत आहे का की तुम्हाला उमेदवारांच्या गुन्हेगारी पार्श्वभूमीची माहिती मिळू शकते?".

# महाराष्ट्रातील मतदानाच्या वागणुकीबाबत वैशिष्टयपूर्ण निरीक्षणे

- महाराष्ट्र सर्वेक्षण 2018 नुसार मतदारांच्या सर्वाधिक टक्केवारीने असे नमूद केले की निवडणुकीत मतदान करण्याचे सर्वांत महत्त्वाचे कारण म्हणजे मुख्यमंत्रीपदाचा उमेदवार हे आहे (महत्त्वाचे: 45% आणि खूप महत्त्वाचे: 32%.) त्यानंतर स्वतः उमेदवार हे एक महत्त्वाचे कारण आहे (महत्त्वाचे: 59% आणि खूप महत्त्वाचे: 17%) आणि शेवटी उमेदवाराचा पक्ष (महत्त्वाचे: 52%आणि खूप महत्त्वाचे: 22%).

- सुमारे 17% मतदारांसाठी रोख रक्कम, दारू भेटवस्तू इत्यादींचे वाटप हे निवडणुकीत एका विशिष्ट उमेदवारासाठी मतदान करण्याचे एक महत्त्वाचे (12%)आणि खूप महत्त्वाचे (5%) कारण होते.

- एखाद्या निवडणुकीत कोणत्या उमेदवाराला मतदान करायचे हे ठरवत असताना महाराष्ट्रातील 83% मतदार म्हणाले की, त्यांचे स्वतःचे मत सर्वांत महत्त्वाचे ठरले आणि त्यानंतर त्यांच्या जोडीदाराचे मत (6%)महत्त्वाचे असलेले मतदार आणि नंतर कुटुंबातील सदस्याचे मत महत्त्वाचे असलेले (6%) मतदार होते.

- मोठ्या प्रमाणावरील मतदारांना (73%)हे माहीत होते की रोख, भेटवस्तू इत्यादींचे वितरण बेकायदेशीर आहे.

- सुमारे 40% मतदार म्हणाले की, मतदारांना त्यांच्या मतांच्या बदल्यात अशा प्रकारची आमिषे दाखवण्यात आल्याच्या घटना त्यांना माहीत होत्या.

- 98% मतदारांच्या मते गुन्हेगारी पार्श्वभूमीचे उमेदवार संसद किंवा राज्य विधानसभेत नसावेत.


- 53% मतदारांना आपण उमेदवारांच्या गुन्हेगारी पार्श्वभूमीची माहिती मिळवू शकतो हे माहीत होते.

- गुन्हेगारी पार्श्वभूमीच्या उमेदवारांना मतदान करण्यासंदर्भात 37% मतदारांच्या मते लोक अशा उमेदवारांना मतदान करतात कारण हे उमेदवार एरवी चांगले काम करतात.


- गुन्हेगारी पार्श्वभूमीच्या उमेदवारांना मतदान करण्यामागे जात आणि धार्मिक बाबी हेही महत्त्वाचे घटक असल्याचे 36% मतदार सांगतात.

- 35% मतदारांच्या मते लोक गुन्हेगारी पार्श्वभूमीच्या उमेदवारांना मतदान करतात, कारण त्यांच्या मते अशा उमेदवारांवरील गुन्हे गंभीर स्वरूपाचे नसतात.


- गुन्हेगारी पार्श्वभूमीच्या उमेदवारांना मतदान करण्यातील आणखी एक मोठा घटक म्हणजे तो उमेदवार शक्तिशाली आहे (35%) आणि उमेदवारांना त्याच्या गुन्हेगारी पार्श्वभूमीची माहिती नाही (35%).





*आलेख* 7 मतदान वर्तणुकीवर परिणाम करणारे घटक




*आलेख* 8: "एखाद्या निवडणुकीत कोणत्या उमेदवाराला मतदान करावे हे ठरवण्यासाठी कोणाचे मत सर्वांत महत्त्वाचे ठरले?".




*आलेख 9: निवडणुकीत गुन्हे आणि पैशांच्या भूमिकेबाबत मतदारांमधील जागरूकता*





*आलेख 10 : निवडणुकीत लढणाऱ्या गुन्हेगारी पार्श्वभूमीच्या उमेदवारांबाबत मतदारांचे मत*

# मतदारांचे लोकसंख्यात्मक तपशील

- सर्वेक्षण करण्यात आलेल्या मतदारांपैकी 58% मतदार ग्रामीण भागांमधील तर 42% शहरी भागांमधील होते.
- 66% पुरूष तर 34% महिला होत्या.
- 72% मतदार खुल्या जातींचे तर, 11% अनुसुचित जाती, 9% अनुसुचित जमाती आणि 8% इतर मागासवर्गीय होते.

प्रतिसादकांचे इतर तपशील खालील आलेखात नमूद करण्यात आले आहेत.




*आलेख 11: मतदारांचे लोकसंख्यात्मक तपशील*

# निष्कर्ष

महाराष्ट्र सर्वेक्षण अहवाल 2018 मधून असा निष्कर्ष निघतो की महाराष्ट्रातील मतदारांच्या प्राधान्यक्रमांकडे सत्तेतील सरकारने दुर्लक्ष केले आहे. ही गोष्ट या बाबीतून स्पष्ट होते की, सरकारची कामगिरी अत्यंत वाईट आहे आणि मतदारांनी दिलेल्या श्रेणीनुसार जवळपास सर्व सर्वोच्च प्रशासन समस्यांवर भीषण आहे. मतदारांच्या प्राधान्यांच्या एकूणच प्रवाहाचे आणि महाराष्ट्रातील सरकारच्या कामगिरीचे विश्लेषण सरकार आणि लोकप्रतिनिधींसमोर काही गंभीर प्रश्न उभे करते-

- दळणवळणाची साधने, सामाजिक आणि आर्थिक विकास यांच्यासारख्या विविध घटकांमधील सार्वजनिक धोरणाशी संबंधित निर्णय एकूणच सामाजिक कल्याणाचा बळी देऊन समाजाच्या विशिष्ट वर्गांच्या हितासाठी घेण्यात येतात का??
- सरकारला मतदारांच्या प्राधान्यानुसार अर्थसंकल्पीय खर्चाचे वितरण/ नियोजन करण्याची गरज आहे का?
- निवडणुकीच्या जाहीरनाम्यात देण्यात आलेल्या वचनांची पूर्तता करण्यासाठी राजकीय पक्षांना आणखी उत्तरदायी कसे बनवता येईल?
- समाजाच्या वंचित घटकांना रोजगार, चांगले आरोग्य आणि पिण्याचे पाणी पुरवण्यसाठी धोरणात कोणते बदल करावे लागतील?

राजकीय नेत्याची निवड झाल्यावर मतदारसंघाची काहीही भूमिका नसते ही गोष्ट निवडून आलेल्या उमेदवारांचे प्राधान्य राजकीय पक्षांना ठरवण्याची संधी देते. त्यामुळे आपले प्रतिनिधित्व जास्त चांगल्या पद्धतीने करू शकणाऱ्या उमेदवाराची निवड करण्याची काळजी मतदारसंघाने घेतली पाहिजे.

राजकीय प्रतिनिधित्व म्हणजे राजकारण आणि प्रशासनात मतदारसंघाचे प्राधान्य समोर ठेवणे हे होय. या गुणांकनामागे आपल्या देशातील लोकांसमोर असलेल्या रोजच्या समस्यांची सत्यता आहे. हे गुणांकन हीच बाब अधोरेखित करण्याचा आणि आपल्या सरकारला या आकडेवारीचा अर्थ आणि या देशातील मतदारांच्या मते सरकार कसे आहे हे सांगण्याचा प्रयत्न करते.

# घोषणापत्र

हे सर्वेक्षण भारतातील मतदारांसमोर असलेल्या त्यांच्या रोजच्या आयुष्यातील सर्वांत गंभीर प्रशासकीय समस्या अधोरेखित करण्यासाठी आणि या समस्यांवर काम करण्याबाबत त्यांच्या संबंधित सरकारमुळे ते आनंदी आहेत का हे तपासण्यासाठी करण्यात करण्यात आले.

हे सर्वेक्षण सुयोग्य वैज्ञानिक तंत्रांचा वापर करून करण्यात आले आणि त्यातील निष्कर्ष आणि अहवाल मान्यताप्राप्त माहिती विश्लेषण तंत्रांचा वापर करून बनवण्यात आले. या अहवालातून काढण्यात आलेले निष्कर्ष भारतीय मतदारांनी दिलेल्या प्रतिसादावर आधारित आहेत.

हे सर्वेक्षण हा भारतीय मतदारांच्या प्रशासकीय मागण्या आणि भारतीय मतदारांच्या मते संबंधित सरकारने पूर्ण केलेल्या गोष्टी यांच्यामधील तफावत तपासण्याचा पद्धतशीर आणि वैज्ञानिक प्रयत्न आहे. हे सर्वेक्षण कोणत्याही सरकार किंवा राजकीय पक्षाला किंवा व्यक्ती किंवा इतर कोणतीही संघटना किंवा संस्था यांचे कौतुक किंवा अपमान करण्याच्या हेतूने करण्यात आलेले नाही.

एडीआरने या अहवालात असलेल्या माहितीची अचूकता आणि विश्वासार्हता यांची काळजी घेण्याचा प्रयत्न केला आहे.
या अहवालाचा वापर किंवा माहितीचा आधार घेणाऱ्या व्यक्तींनी 'महाराष्ट्र सर्वेक्षण अहवाल - 2018' असा स्रोत नमूद करावा.

## To Get Information About Candidates/Parties/MPs/MLAs/ Corporators/PILs in courts

National Election Watch

Give us missed call on: **08010445555**

Toll Free Helpline No: **1800-110-440**

Journalist Helpline no: **8010394248**

Subscribe to ADR on **WhatsApp** for updates: **7840067840**

Visit: **www.myneta.info**

Email: **adr@adrindia.org**

Send SMS: **Myneta <pincode or constituency> to 56070 or 9212356070**

To contact ADR State Partners, visit:
**https://adrindia.org/about-adr/state-coordinators**

## Social Media

/myneta.info /adrindia.org @adrspeaks /adrspeaks /adrspeaks

https://in.linkedin.com/company/association-of-democratic-reforms-adr-

## Our Websites

**www.adrindia.org**

Provides detailed analytical reports of Lok Sabha, State Assemblies, local body elections & financial reports of political parties & ongoing PILs in courts

**www.myneta.info**

Provides full information of criminal cases, asset, liability and education details declared by candidates in the self sworn affidavits

## Android Apps

**Myneta:** The criminal, financial, educational & other background information self declared by candidates in their affidavits during elections is now available on your mobile phones.

**Election Watch Reporter:** This app provides a tool to the citizens to capture violations of election related laws & the code of conduct.
**Both the applications are available on Google Play Store.**